# प्रकरण सहावे

## वाङ्‌मयीन मुल्यमापन

" तुकाराम दर्शन" मध्ये सदानंद मोरे यांनी तुकारामाच्या सर्व अभ्यासकांचे मतांचे संकलन केलेले आहे. त्यांच्या मांडणीला एक सौंदर्य आहे भाषा अभिरूची संपन्न आहे त्याचा अभ्यास.

" विद्रोही तुकाराम" या ग्रंथात आ. ह. साळुंखे यांचे स्वयंपूर्ण आणि स्वयंस्फूर्त असे एक चिंतन आहे वर्ग व वर्ण सनातन संघर्ष यातील ताण तणाव या ग्रंथात आलेले आहे.

विद्रोही तुकाराम व तुकाराम दर्शन " तुकारामांच्या साहीत्याचे अंतरंग व त्या अंतरगाची उकल करणारी ही दोन पुस्तके गेल्या पाच प्रकरणामध्ये अभ्यासत आहेत आता या दोन्ही ग्रंथाच्या वाङ्‌मयाचे सौंदय आणि तुकारामाच्या अभंगाचे सौंदर्य या दोन्हीचा आपल्या थोडक्यात विचार करायचा आहे.

वाङ्‌मयीन मुल्यमापन

एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर आज जग उभे आहे एकीकडे विज्ञान व तंत्रज्ञान यामुळे मानवी जीवन समृद्ध होत आहे तर दुसरीकडे चंगळवाद व भोगवादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या माणसांची विवेक शक्ती हरविली आहे एकीकडे धर्म भक्तिभावना यांच्या नावाखाली उत्सव यज्ञयाग तीर्थयात्रा याचे प्रचंड स्तोम निर्माण झाल्याचे दिसून येते तर दुसरीकडे माणुसकी शून्य सैतानी प्रवृतिचे आकांडतांडव समाजात पाहवयास मिळते. श्रद्धेच्या कडा कोमेजून असा व्यापार व बाजार धर्माच्या नावाखाली चालू आहे. तर दुसरीकडे देव धर्म या संकल्पनाना अंधश्रद्धेच्या नावाखाली सतत झोडपणेही चालु आहे. अशा अंधःकारमय स्थितीत तुकोबांची वाणी एखदया दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरते. माणसाच्या अस्तित्वाचा खरा अर्थ तुकोबांनी जितक्या नित्संदिग्धपणे कथन केला आहे. तेवढा कुणीच कथन केला नाही.

जगातील कोणत्याही संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन आहे. हे कोण्याही विचारी माणसाला मान्य करावे लागेल आजवर कित्येक संस्कृतीच्या उदय झाला तसा कालाच्या ओघात अस्तही झाला पण भारतीय संस्कृती स्वकीय परकीयांचे आघात सोसून जिवंत राहते असे या संस्कृतीच्या पोटात कोणते अमृत भरले आहे याचा विचार केल्यास ' असामान्य अधिकारचे संत' हेच या संस्कृतीच्या पोटातील अमृत आहे हे संत या संस्कृतीच्या –हासाचे वेळी अवतीर्ण होवून हिला पुनरूज्जीवीत करतात. संस्कृती शब्दाचा सामान्य अर्थ संस्कार असा आहे. तरीपण संस्कृतीत तत्वांचा समावेश होतो.

भारतीय संस्कृतीमध्ये – 1. तत्वज्ञान, 2. धर्म. 3. समाजरचना, 4. अर्थव्यवस्था, 5. राजशासन या तत्वांचा अंतर्भाव होतो.

याच संस्कृतीच्या माध्यमातून तुकारामांनी आपले अद्वैत तत्वज्ञान समाजापुढे मांडले आहे. वैदिक धर्माचाही उल्लेख केला आहे. समाजरचना वर्णाश्रममुक्त असावी हे अट्टाहासाने सांगितले आहे. राजशासन हे धर्मनियंत्रित असावे हे मांडले आहे.

अर्थव्यवस्थेच्या बाबतीत तुकाराम महाराज म्हणतात

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदासे विचारे वेंच करी ।**

धन हे धर्मनितीने मिळवावे आणि निष्कामबुध्दीने व विचारपूर्वक सत्कार्याकडे खर्च करावे असे सांगितले आहे.

तुकारामांच्या वाङ्मयात अंतकरणाचा ठाव घेणारे शब्द आहेत. माणसाचे चुकते कोठे ? त्यावर नेमके बोट ठेवून दोषाचा अविष्कार केला आहे हे वाःङ्मय रसालंकार निर्माण करून केवळ रसिक लोकांचेच रंजन करण्याकरीता नसून सर्व थराच्या लोकांचेच हिताकरीता प्रवृत्त झालेले आहे. सध्याच्या काळात काही साहित्यिकांनी नैतिक नियम धाब्यावर बसवून वाङ्मयाचे हिडीस प्रदर्शन मांडले आहे. तिला नितीची चव राहिली नाही. धर्माची चाड राहिली नाही ज्या मराठी भाषेची ज्ञानेश्वर महाराजांनी अमृताशी तुलना केली त्या मराठी भाषेला अश्लिलतेची घाण सुटली आहे.

पण संताचे वाङ्मय नीती धर्म आणि अध्यात्म यांनी सुगंधी आहे. कोणत्याही काळात ते नित्य नूतन असल्यामुळे अमर आहे आणि रसिकापुरते मर्यादित नसून सर्व लोकांकरीता आहे. काव्यात जे काही ओज प्रसाद माधुर्य – इत्यादी गुण असावे लागतात ते सर्व तुकारामांच्या अभंगात आहेत तसेच रस आणि शब्दालंकार, अर्थालंकार हेही आहेत त्यासंबंधी आपण थोडा विचार करू. रस म्हणजे आनंद, वेदान्त शास्त्र दृष्टीने आनंद हे ब्रम्हाचे स्वरूप आहे.

आणि उद्दिपनविभाव, अनुभाव आणि व्यभिचार भाव यांच्याद्वारा व्यक्त होणारा स्थायिभाव तोच ब्रम्हस्वरूप आनंद असून त्यालाच रस असे म्हणतात हे रस नउ प्रकारचे आहेत. त्यापैकी शृंगाररस – गवळणी सौरी व्यभिचारीणी इत्यादी अभंगात मूर्तिमंत आहे. ' वीर विठ्ठलाचे गाढे आम्ही वीर झुंझार आहे. या अभंगात वीर रस आहे.

" कोठे गुंतलासी द्वारकेचा राजा । आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा इत्यादी अभंगात करूणरस आहे.

बाळक्रिडेच्या अभंगात अद्‌भुतरस उत्कटपणे मांडला आहे.

काशीला जाणारा कृपण पंढरीला जाणारी आवा, नव–याला गाढव करणारी स्त्री, मेंढयाकरीता रडणारी धनगर ही हास्यरसाची मुर्तिमंत उदाहरणे.

कई ऐसी दशा येईल चिंतापांडूरंगाचा झरतसे।।

' काय मी उद्धार पावेन काळ चितने इत्यादी अभंगात शांतरस आहे.

आता भक्तिरसहा एकस्वतंत्र रस मानावयाचा किंवाा नाही याविषयी साहीत्यिकात वाद आहे. तुकाराम महाराजांनी भक्तिरस हा दहावा रस आहे असे कोठेही विधान केले नाही. तरी पणभक्तिरस हा शब्द त्यांच्या अभंगात पुष्कळ ठिकाणी आला आहे.

अशा प्रकारे नवरसांचा सार तुकारामांच्या अभंगात आढळून येतात.

आता आपण अलंकारही पाहू. स्वभावोक्ती अलंकार – जो अर्थ सामान्य माणसाला कळण्यास सूक्ष्म आहे अशा अलंकाराला स्वभावोक्ती अलंकार म्हणतात. उदा.

आनंद अद्वय नित्य निरामय। जे का निजध्येय योगीयांचे ।।

ते हे समचरण साजिरे विटेवरी ।।

सहजपणे इथे अलंकार कळत नाही येथे स्वभावोक्ती अलंकार आहे.

विषम अलंकार – या अलंकारात अनेक भेद आहेत. त्यापैकी विरूद्ध रूपांची संघटना ज्यात वर्णिली असते त्याला विषय अलंकार म्हणतात जसे

हरि तुझी कांती रे सावळी । मी रे गोरी चाफेकळी

तुझ्या दर्शने होईन काळी हे वाळी जन मज ।।

यात सावळी कांती असलेला हरी आणि चाफेकळी सारखी गोरी असलेली गौळण यांच्या रूपाची दाखविली आहे.

अनन्वयालंकार – या अलंकारात एकच वस्तू उपमान व उपमेय या रूपात सांगितली जाते जसे

तुझ वर्णी ऐसा तुजविण नाही।

दुजा कोणी तिही त्रिभुवनी ।।

रूपक अलंकार – उपमानाचा उपमेयावर अभेदारोप करणे जसे ' आधित्य भ्रतारे काम नोहे पुरा। म्हणुनी व्यभिचार टेकियले.

बिरोधाभास अलंकार – ' मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास कठिण वज्रास भेदु ऐसे
अनुमानालंकार – आजि कां वो तू दिससी दुश्चित अशी अलंकाराची अनेक उदाहरणे आपल्याला तुकारामाच्या अभंगात आढळतात. १

संस्कृत वाङ्मयात कालिदासाची उपमा, भारवीचा अर्थगौरव दण्डीचे पदलालित्य हे जसे प्रसिद्ध आहे त्याप्रमाणे मराठी वाङ्‌मयात ज्ञानेश्यरांची ओवी, तुकाराम महाराजांचा अभंग आणि एकनाथ महारांजांचे भारूड हे अगदी ठरून गेले आहे. श्री. तुकाराम महाराजांच्या अभंगात ओझप्रसाद माधुर्य ठसकेदारपणा हे तर गुण आहेतच पण प्रत्येक चरणात अंत्यचरणाच्या अर्थाची आकांक्षा न ठेवता स्वतंत्र सिद्धांतभूत अर्थ असून दोन चरणांचा मिळून एक वाक्यार्थ आणि संबंध अभंगाचा मिळून एक महावाक्यार्थ होतो. प्रत्येक चरणाचा ध्रुवपदाशी संबंध जोडला की एक महावाक्यार्थ होतो येऱ्हवी प्रत्येक चरणाचा स्वतंत्र अर्थ होवू शकतो जसे ' न करी रे संग । संग करू नकोस । येवढे देखील एक उपदेश वाक्य होवू शकते ' लागो नेदी मळ ममतेचा ' येवढे देखील अर्थ दृष्टीने स्वतंत्र वाक्य होवू शकते आणि या दोन वाक्यांची या नावे अद्वैत खरे ब्रम्हज्ञान या ध्रुवपदाशी सांगड घातली म्हणजे अद्वैत ब्रम्हज्ञानाचे लक्षण सांगण्याचा या अभंगाचा आशय आहे हे सिद्ध होते हाच न्याय सर्व अभंगाच्या बाबतीत आहे.

श्री तुकोबारायांची विद्वता.

श्री तुकोबा संत होते तसेते विद्वान होते. जसे ब्रम्हानंदी डुलणारे होते तसे ते शब्दज्ञानातही पारंगत होते. त्यानी देवाची खडे निवडली, पुराणीचा इतिहास पाहीला, सहा शास्त्रे पाहीले

1. चार्वाक दर्शन

   जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण ते मुक्ति पाखंडयांची ।। १।।
   पिंडाच्या पोषकी नागविलेजन। लटिके पुराण केले वेदा ।। २।।
   या अभंगात चार्वाकाचे मत मांडून त्याचे खंडणही केले नाही.

2. पूर्णप्रज्ञ दर्शन

एक बोटाची निशाणी या अभंगात पूर्णप्रज्ञांचा आचार सांगुन हे पूर्णप्रज्ञ स्वतःस वैष्णव म्हणून घेत असले तरी ते भेदभादी आहेत त्यांना सर्व विष्णुमय आहे हे कळत नाही असा आशय या अभंगातून स्पष्ट होतो. [3]

अशा विद्‌वान व्यक्तीवर लिहलेले दोन विद्‌वानांचे दोन ग्रंथ अभ्यासताना तुकारामांचे श्रेष्ठत्व तर कळलेच पण तुकारामाच्या जीवनाचे यथार्थ दर्शनही घडले दोन्हीही ग्रंथाची भाषा प्रौढ प्रगल्भ आहे. दोन्हीही ग्रंथात सरळ सोपेपणा आहे प्रासादिकता आहे विद्रोही तुकाराम हे पुस्तक आ. ह. साळुंखे यांनी स्वानुभुतीने लिहले आहे ते रस्वस्वादात मोडते तर सदानंद मोरे यांचे पुस्तक वाङ्‌मयीन सौदर्याची इतर मते संकलित केलेली आहेत. मोरे यांच्या लिखाणात रंजकता आहे. विविध हकीगती मोरे यांनी सरळ कथनातून मांडली आहेत मोरे यांची कथन करणारी भाषा आहे.

दोन्ही पुस्तकांच्या अभ्यासकरताना जाणवत की मुळातच तुकोबांच्या वाणीत रसरशीतपणा आहे, तुकोबांचे लिहणे मोठे सुत्रबद्ध आहे थोडया शब्दात मोठा अर्थ सांगण्याचे सामर्थ्य तुकोबांच्यावाणीत आहे. तुकोबाच्या कित्येक वचनाना सुभाषितात अर्थ प्राप्त झाला आहे.

1. तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात
2. तुका म्हणे येथे पाहीजे जातीचे । येरा गबाळाचे काय काम
3. जे कारंजलेगांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
   तोची साधु ओळखाचा ।देव तेथेचि जाणावा ।।
4. गाढव शृंगारले कोडे । काही केल्या नव्हे घोडे
5. दया तिचे नाव भूताचे पाळण । आणिकनिर्दाळण कंटकाचे

या म्हणीवजा सुभाषितात प्रंपच, परमार्थ काव्य सर्व काही आहे वाणीतली भेदकता, बुद्धीचे स्वातंत्र्य व अंतरीचा प्रत्यय या तीन गुणामुळे तुकोबांचे काव्य श्रेष्ठ ठरले. तुकोबांचे अंतकरण अत्यंत पवित्र व त्यात भाक्त रसाचा झरा वाहत असलेला

त्यामुळे तुकारामांच्या काव्यात खरी कळकळ जिव्हाळा भरून राहीला आहे.

कविवर्य तुकाराम म्हणजे प्रामाणिक भावोत्कट काव्याचा परमोत्कर्ष आहे. आत्मप्रत्ययातून तुकारामांनी काव्य लिहीली.

**कन्या सासुरासि जाये । मागे परतोनी पाहे ।**
**तैसे जाले माझ्या जिवा । केव्हा भेटसि केशवा**
**चुकलिया माये । बाळ हुरहुर पाहे**
**जीवना वेगळी मासोळी तैसा तुका तळमळी**

सासरी निघालेली कन्या आपल्याला कायमच्या दुरावणऱ्या माहेराकडे जशी कालवलेल्या अंतकरणाने पाहते किंवा चुकामुक झालेल्या आईकडे हुरूहुर पाहणारे बालक जसे असते तशी आपली अवस्था झाली आहे. असे म्हटल्यावर आता अधिक सामर्थवान शब्दातून ही भावना कुणालाच सांगता येणार नाही तुकोबांची भक्ती ज्याप्रमाणे दृढ त्याप्रमाणे त्यांचे शब्दही तितकेच दृढ त्यात बदल करणे कठीण श्रेष्ठ कवीचे शब्दही त्याच्या भावनेची परीणीती असल्यामुळे त्यात बदल करणे शक्यच नाही पण त्याचबरोबर त्यांचा एक एक शब्द म्हणजे समाजाच्या नव्या रचनेसाठी काळजीपूर्वक ठेवलेली एक एक वीट होती. एक कपटी व्यवस्था मोडायची आणि दुसरी मधुर रसाळ व्यवस्था उमी करायची असा त्याचां प्रयत्न होता. तुकारामांनी वैदिक पंडितावर ओढलेले कोरडेही काही व्यक्तिगत लहरीचा वा सुडाचा भाग नव्हता हा काही दृष्टपणाचा नव्हता की त्यामागे विध्वसंकता नव्हती आपला सर्व समाज विविध अंगानी संतानी मोहरून यावा आणि त्या मोहरातून टपोरी फळे रसरसून यावीत बहरून यावी यासाठी तुकारामांनी केलेले एक निर्भय आचरणाभिमुख आणि परिपक्त चिंतन त्या धडपडीमागे होते.

कवितेमध्ये रस असावा असे तुकोबा सांगतात तुकोबाच्या काव्यातील रसाबद्दल सदानंद मोरे म्हणतात.

कवितेत सत्य असावे सत्याचा अनुभवाचा अविष्कार असावा साधारणपणे कविता हे माध्यम सत्य सांगण्यासाठी असते असे मानले जाते सत्य असणे वाक्याचा,

गद्य वाक्याचा गुणधर्म  मानला जातो. कवितेसारख्या कलेचे प्रयोजन वेगळे असल्याचेही मानले जाते.  तुकोबा सत्यासाठी माझी विवंचना असे म्हणतात. नाही सरो येत जोडील्या वचनी कवित्वाची वाणी कुशलता । सत्याचा अनुभव वेधी सत्यपणे अनुभवाच्या गुण रूची येतो ।। (2706) इतकेच नव्हे  तर काव्यात सत्य नसेल तर त्याच्या मधे उपस्थिती असलेला रस वितळेल याचा विरस होईल असे ही तुकोबा सुचवतात म्हणजे सत्याचा अभाव हे एक वेगळे रसविघ्न  तुकोबांनी मानलेले दिसते.

तू माऊलिहून मयाळ, चंद्राहूनि शीतळ,
पाणियाहुनि पातळ, कल्लोळ प्रेमाचा
देऊ काशाची उपमा  दुजी तुज पुरूषोत्तमा ओवाळूनि  नामा तुझ्या वरूनि टाकिलो
तुवा केले रे अमृता गोड त्याही तूं परता, पाचा तत्वांचा जाणिता सकळ सत्ता नायक.
काही न बोलीनि आता उगाच चरणी ठेवितो माथा,
तुका म्हणे पंढरी नाथा क्षमा करी अपराध

समाज कंटकावर तीक्ष्ण शब्दांचा भंडिमार करणारे तुकाराम या ठिकाणी कोमल हळुवार शब्दांनी इश्वराची आराधना करताना दिसतात पंढरीनाथाचे तुकारामानी अत्यंत नाजूक शब्दांनी केलेले वर्णन ह्यदय आहे शिवाय या अभंगाात अगतिकता दिसते भावहि मोठा मनोहर आहे. तुकारामांची या अभंगासाठी भाषा अमृतापेक्षाही गोड आहे असेच म्हणावे लागेल अरूपाचे वर्णन करताना शब्द अपुरे पडावेत यात नवल नाही.

हिरा ठेविता ऐरणी
वाचे  मारीता जो घणी
तोचि मोल पावे खरा
करणीचा हायचुरा
मोहरा होय तोचि अंगे
सूत न जळे त्याचे संगे

तुका म्हणे तोचि संत
सोसी जगाचे आघात

ऐरणीवर ठेवून घणाचे तडाखे दिले असतानाही फुटत नाही तोच खरा हिरा होय. कृत्रिम असला तर त्याचे केव्हाच चूर्ण होते ज्याच्या अंगा भोवती गुंडाळलेली सुत अग्नीमुळे देखील जळत नाही तोच खरा मोहरा होय. त्याप्रमाणे लोकनिदेंचे घाव जोसहन करतो तोच खरा संत होय.

शुध्द बीजा पोटी.
फळे रसाळ गोमटी.
मुखी अमृताची वाणी.
देह वेचावा कारणी.
सर्वांगी निर्मळ.
चित्त जैसे गंगाजळ.
तुका म्हणे जाती.
ताप दर्शने विश्रांती.

शुध्द बी असले तर त्यापासून निर्माण होणा–या वृक्षवेलींना रसाळ व सुरेख फळे येतात त्याप्रमाणे दुस–याला चैतन्य देणारे अमृतमय गोड शब्द बोलावे आणि शरीर सत्कारणी खर्च करावे. गंगेचे पाणी जसे आतून बाहेरून निर्मळ असते तद्वत आपण आपले चित्त शुध्द राखावे अशा पवित्र माणसाच्या दर्शनाने विविध ताण नाहीसे होवून मनाला शांती प्राप्त होते.

सज्जनांच्या संगतीचे महत्व तुकाराम सांगतात. व्यक्तिला प्राप्त होणारे पावित्रय, शुचित्व हे विचार आणि आचार यावर अवलंबून असते. तुकारामांनी हया तीनही गोष्टीचा इथे उल्लेख केलेला आहे 'मुखी अमृताची वाणी म्हणजे गोड उच्चार, मधाळ बोलणे निर्मळ चित्र म्हणजे शुध्द व पवित्र विचारांचे माहेरघर आणि देह वेचावा कारणी म्हणजे प्रत्यक्ष कार्य आचार अशीच व्यक्ती महान होते. तिच्या जीवनात उदात्त मुल्यांची जोपासना होते अशांच्या संगतीत शरीर मन आत्मा यांचे

आधिभौतिक, आध्यात्मिक ताप शांत होवून विश्रांती मिळते. जीवन सुंदर करणारे विचार तुकारामांनी अर्थसुलभ तुकाराम महाराजांच्या तत्व चिंतनात आचरणात्मक भागाला फार महत्व आहे. कोरडे तत्वज्ञान शुष्क शब्दचर्चा त्यांना मान्य नाही. तुकोबांच्या वचनातून आचारधर्माचा लोकशिक्षणाचा बोध होतो. तुकारामांनी पाखंडाचे खंडण करून लोकधर्माची नव्याने मांडणी केली.

अशा शब्दकलेत अभंगात तुकारामांच्या अंतकरणातील निर्मळ मन पडलेले दिसते. आज साडेतीनशेच्या वर वर्षे होवून गेली पण तुकारामांच्या अभंगाची जनमानसावरील पकड दिवसेंदिवस वाढतच आहे. साध्याभोळया वारक–यापासून विद्यापीठाची उच्च पदवी प्राप्त करू पाहणा–या संशोधकापर्यंत प्रत्येक जण तुकोबांच्या अभंगाने भुलून गेला आहे. आ. ह. साळुंखे यांना विद्रोही तुकाराम या ग्रंथाची निर्मिती करण्यापूर्वी तुकारामांचा आदर तर असेलच परंतु एवढी मोठी चिकित्सा कशालाही न घाबरता करणे म्हणजे अवघड काम आहे. आजवर इतक्या लोकांनी तुकाराम त्यांचे कार्य व अभंग लिहले पण आ. ह. साळुखे यांचेसारखे धाडस कोणालाही झाले नाही ही साळुंखे यांच्याकडे येणारी ताकद सुध्दा तुकारामांच्या सखोल अभ्यासाची व चिंतनाची आहे. खरा तुकाराम साळुंखे यांनाच समजला साळुंखे यांनाच भावला कारण तुकारामावर आजपर्यंत जेवढी लिखाणे झाली जेवढे चिंतन झाले तेवढया कोणत्याही लेखकांना तुकाराम पूर्णपणे कळला नव्हता साळुंखे यांना मिळालेला तुकाराम म्हणजे साळुंखे यांच्या सखोल अभ्यासाची चिंतनाची परिणीती आहे. साळुंखे यांचे संशोधन कार्य स्वयंस्फूर्त आहे यात शंका नाही. साळुखे यांना तुकाराम पूर्णपणे कळला याचा त्यांच्या वाङ्मयात त्यांना कुठेही गर्व नाही. कुठेही स्वतःच्या पढीकतेचा ज्ञानाचा मोठेपणा मांडलेला दिसत नाही. हा सुद्धा मनाचा मोठेपणा नक्कीच तुकारांमाच्या अभ्यासातून त्यांना मिळालेला असेल.

सदानंद मोरे यांनी सुद्धा इतक्या अनेक विचारवंतानी मांडलेला तुकाराम एका छत्राखाली आणून त्याचे चिंतन करणे म्हणजे इतके बहुश्रूत लिखाण त्याचा अभ्यास करणे हे मोठे जिकिरीचे काम आहे परंतु अत्यंत आनंदाने भारावून

जावून मोरे यांनी  हे काम केले आहे. इतक्या लेखकांची विचारवंताची मते आपल्या लिखाणत मांडणे व तुकारामांचा सर्वांगीण अभ्यास करणे हेच वाङ्मयाचे मुल्यमापन होवू शकते.

थोडक्यात दोन्ही ग्रंथाबद्दल बोलायचे झाल्यास विद्रोही तुकाराम हे स्वयंपूर्ण स्वयंस्फूर्त  चिंतन तर ' तुकाराम दर्शन हे बहुश्रूत वैचारीक लिखाण आहे.

तुकाराम महाराज हे बहिमुर्खतेच्या उंबरठयावर बसून अंर्तमुख असणारी काव्ये लिहणारा हा कवीशब्दांच्या संदर्भात अत्यंत चोखळ आहे.रचना ही तशीच बंदिस्त आहे म्हणून तर ते स्वतःच म्हणतात.

तुका म्हणे झरा मुळीचाचा खरा
अंतरीचे धागे स्वभावे बाहेरी

ही साहीत्यविषयक ही प्रमेय आहे.

हेच वाङ्मयाचे मुल्यमापन होवू शकते.

जो कोणत्याही शाळेत गेला नाही ज्याने कोणतीही पदवी प्राप्त केली नाही त्याने जगाला मोठे ज्ञान दिले सज्ञान केले अशा तुकारामावर डॉ. मोरे व डॉ साळुंखे या दोन विद्वानांनी केलेले लिखाण व त्याचा अभ्यास म्हणजे दोन विचारप्रवाहाद्वारे एका मोठया समुद्राला जावून भिडणे होय.

सदानंद मोरे यांचे अनेक अभ्यासकांच्या मतांचे संकलन म्हणजे मोरे यांच्या प्रवाहाला मिळालेले मोठे मोठे झरे तर साळुंखे यांचे लिखाण म्हणजे दऱ्या खेऱ्यातून केलेली कठिण वाटचाल होय.

सदानंद मोरे यांनी बौद्ध काळापासून चालत आलेली जी पुरोगामी चळवळ आहे तिचा हा उद्रेक कसा कुठे झाली त्याचे परिणास कसे झाले याचे यथार्थ दर्शन घडवले आहे. तर सत्तेसाठी केलेले राजकारण टिकतनाही  तुकारामानी मांडले धर्मकारण व राजकारण कसे एकत्र चालते त्याचे विवरण यर्थार्थपणे आ. ह. साळुंखे यांनी केले आहे.  मानवता, दया, भूतदया या सोप्या भाषेतून जगाला पुढेही  नेता येत नाही  न्यायबुद्धी व कठोरपणे विचार मांडून जगाला पुढे नेता येते तुकारामानी

स्वतः हाल सोसून समाजावर कठोर शब्दांत प्रहार करून समाजाला प्रगतिपथावर नेले हे आ. ह. नी आपल्या ग्रंथात स्पष्ट केले आहे.

आज महाराष्ट्राच्या सर्व पुरोगामी विचाराच्या विचाखंताना सनातन्यांना हादरा देणारा आ. ह. साळुंखे यांचा विद्रोही तुकाराम आहे म्हणूनच महाराष्ट्रात गदारोळ उठला.

महाराष्ट्र टाईम्समधील वाद हा माझा अभ्यासाचा भाग नव्हे तरी सुद्धा लहान तोंडी मोठा घास घेण्याचा अपराध पदरी घेवून तुम्ही दोघेही तुकारामाचे भक्त आहात दोघांनी मिळून म्हणावे माझै जातीचे मज भेटी कोणी ?

गौतम बुद्धापासून सुरू झालेला हा विराट लढा 21 व्या शतकात आपण पदार्पण करीत असताना पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे धर्मनिरपेक्ष जीवन व्यवहाराचा व्यापक संदेश सर्वत्र जगाला देण्याचा मान भारताला मिळतो आहे हे जग सुंदर व्हावे म्हणून हजारो वर्षे सुरू असणाऱ्या प्रयन्त्नात उच्च ध्येयाचा पाठपुरावा होत आला आहे कोरडया तत्वज्ञानाने बुद्धीला खाद्य मिळाले तरी कर्तबदारीचे कंबरडे मोडते हा विचार संत मंडळीना मान्य झाला पाहीजे मानवी संप्रदायला मान्य असणारे वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान यम नियम कर्मठपणा सोडून सदाचाराकडे प्रयत्नपूर्वक वळवले आहे. या सर्वाचा श्रेष्ठ अविष्कार संत तुकारामाच्या जीवनात अनुभवास मिळतो असा तुकाराम सारख्या आभाळा एवढा माणूस आपला महाराष्ट्राचा आहे याचा अभिमान मानून त्याचा सदासर्वदा शोध घेत राहावे म्हणजे प्रभातकाळी व संध्याकाळी सुर्याचे दर्शन म्हणजे अवघाहन करण्या इतके आनंददायी आहे असा विचार मनात आणता या दोन लेखकांनी तलवारीप्रमाणे लढयाच्या पवित्रात ऐकमेकावर तजवारीप्रमाणे लेखणी उचलावी हा दैव दुर्विलास नव्हे काय

पुरोगामी विचाराचा लढाऊ शिपाई कुठे का असेना त्याने एकमेकाच्या हातातहात घालून लढा देण्यास सज्ज व्हावे असा विचार ताक धुसळताना जसे ताकावर लोणी यावे तसेमाझ्या मनात या दोन ग्रंथाचा अभ्सास करताना आला आहे.